महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ
(महाराष्ट्र शासन अंगिकृत)
Maharashtra Industrial Development Corporation
(A Government of Maharashtra Undertaking)
मुख्य कार्यालय : "उद्योग सारथी", महाकाली गुंफा मार्ग, अंधेरी (पूर्व), मुंबई 400 093.
Head Office : "Udyog Sarathi", Mahakali Caves Road, Andheri (East), Mumbai 400 093.
022-2687 0027/52/54/73
प्रिंसिपल कार्यालय : 4,4 (ए) 12 वा मजला, वर्ल्ड ट्रेड सेंटर, सेंटर-1, कफ परेड, मुंबई 400 005.
Principle Office : 4,4 (A), 12th Floor, World Trade Centre-1, Cuffe Parade, Mumbai-400 005.
: +91-22-22151451/52/53
www.midcindia.org

जा.क्र. मऔविम/म.व्य.(भूमी)/A84158 दिनांक: 12/5/23

# परिपत्रक

**विषय: भूखंडाच्या उर्वरीत अधिमुल्याची (Balance of Premium-BOP) रक्कम भरण्याकरिता कालावधी देणेबाबत.**

सद्य:स्थितीत कोव्हिडमुळे उद्भवलेली परिस्थिती तसेच जागतिक औद्योगिक आर्थिक मंदी आणि त्याचा उद्योग जगतावर होत असलेला परिणाम यामुळे बरेच उद्योजक वाटप आदेश (Allotment Order) निर्गमीत झाल्यानंतर विहीत मुदतीत उर्वरित अधिमुल्याच्या रक्कमेचा (BOP) भरणा करु शकलेले नाहीत, त्याचप्रमाणे उद्योजकांचे स्वत:चे अथवा कुटुंबातील व्यक्तीचे दुर्धर आजारपण, नैसर्गिक आपत्ती, अर्जदाराच्या आवाक्याबाहेरील न टाळता येणारी परिस्थिती (unavoidable circumstances / beyond the control of allottee) इत्यादि कारणांमुळे अर्जदार उद्योजकांना वाटपपत्रातील अटीनुसार भूखंडाच्या उर्वरित अधिमुल्याची रक्कम ३० दिवसांत तसेच धोरणाप्रमाणे १५० दिवसांमध्ये व्याजासह भरणे शक्य होत नसल्याने अशा उद्योजकांना इसारा रक्कम तसेच उर्वरित अधिमुल्याच्या रक्कमेचा भरणा करण्यासाठी वाढीव कालावधी देणेबाबत सद्य:स्थितीत धोरणात्मक तरतुद नसल्याने याबाबतचा प्रस्ताव महामंडळाच्या सदस्य मंडळाच्या दिनांक २३.०३.२०२३ रोजी झालेल्या ३९५ व्या बैठकीत सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावावर सदस्य मंडळाच्या बैठकीत सविस्तर चर्चा होवून ठराव क्रमांक ६५४६ पारीत करण्यात आला असुन भूखंडाच्या उर्वरीत अधिमुल्याची रक्कम भरणा करणेकरिता कालावधी देणेबाबत पुढीलप्रमाणे धोरण निश्चित करण्यात येत आहे.

वाटपपत्रातील १८० दिवसांचा कालावधी संपुष्टात आल्यानंतर अर्जदाराने कोव्हिडमुळे उद्भवलेली परिस्थिती तसेच सद्य:स्थितीतील जागतिक औद्योगिक आर्थिक मंदी



For any requirements related to MIDC, please call us at +91 98338 32485 or email us at info@midcconsultants.in

आणि त्याचा उद्योग जगतावर होत असलेला परिणाम त्याचप्रमाणे उद्योजकांचे स्वतःचे अथवा कुटुंबातील व्यक्तीचे दुर्धर आजारपण (महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रमांक एमएजी २००५/९/प्र.क्र.१/आरोग्य ३, दिनांक १९.०३.२००५ मधील परिशिष्ट 'अ' मध्ये नमूद २७ आकस्मिक व ५ गंभीर आजारांच्या सुचीमधील आजार), नैसर्गिक आपत्ती, अर्जदाराच्या आवाक्याबाहेरील न टाळता येणारी परिस्थिती (unavoidable circumstances / beyond the control of allottee) इत्यादि कारणांमुळे प्रस्तुतचे परिपत्रक निर्गमीत केल्याच्या दिनांकापासुन ९० दिवसांचे आत अर्ज केल्यास अशा प्रकरणांमध्ये प्रकरणपरत्वे प्रस्ताव मंजुर झाल्यापासुन ३० दिवसांचा सशुल्क वाढीव कालावधी देण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम यांना प्रदान येत आहेत.

सदरहु परिपत्रक मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम यांचे मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

( अनिल भंडारी )
सह मुख्य कार्यकारी अधिकारी (प्रशासन)
मऔविम, मुंबई

प्रत:

(१) सर्व विभाग प्रमुख, मऔविम, मुंबई.
(२) अतिरीक्त मुख्य अभियंता, मऔविम, पुणे / नांदेड / नागपूर
(३) महाव्यवस्थापक (भूमी / विधी / भूसंपादन / मा व तं / जनसंपर्क / म.व.वि. / डीएमआयसी / पणन)
(४) सर्व अधिक्षक अभियंता, मऔविम,
(५) सर्व प्रादेशिक अधिकारी, मऔविम,
(६) सर्व कार्यकारी अभियंता, मऔविम,
(७) सह / उप मुख्य लेखा अधिकारी, मऔविम, मुंबई / पुणे / औरंगाबाद / नागपूर.
(८) सर्व महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र,
(९) सर्व औद्योगिक संघटना
(१०) मुख्य मध्यवर्ती परिपत्रक नस्ती / मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम, कार्यालय

midcconsultants.in

For any requirements related to MIDC, please call us at +91 98338 32485 or email us at info@midcconsultants.in